महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासा अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासंवि/रवका/न.क्र.३४८/१३३३७
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
Website : www.mahdiscom.in
दिनांक: १०.०५.२०२३

# परिपत्रक

**विषय: ध्वजदिन निधी संकलन वर्ष २०२२-२३.**

आपल्या देशाच्या सशस्त्र दलातील सैनिक हा आपल्या सर्वांचा प्रेमाचा, आदराचा आणि अभिमानाचा विषय आहे. देशाच्या बहुमोल स्वातंत्र्याचे आणि सार्वभौमत्वाचे तो प्राणपणाने रक्षण करतो. आपत्तीच्या काळात आपद्ग्रस्त देशबांधवांच्या मदतीलाही धावून जातो. उन्हातान्हाची, थंडीपावसाची वा कोणत्याही अडचणीची पर्वा न करता हा बहाद्दर जवान आपली कर्तव्ये बजावत असतो. परकीय शक्तीपासून देशवासीयांचे रक्षण करण्यासाठी आपल्या पाठीशी भक्कमपणे अहोरात्र उभ्या राहणाऱ्या या सैनिकांचे आपल्यावर फार मोठे ऋण असते ते अंशत: जरी फेडायला मिळाले तरी आपल्या सर्वांच्या दृष्टीने ती मोठी संधी ठरते. दरवर्षी याच भावनेतून ७ डिसेंबर, हा दिवस सशस्त्र दलांचा ध्वजादिन म्हणून साजरा केला जातो.

२. महावितरणने गेल्या गत वर्षात या निधीला मोठा हातभार लावला आहे. ही कर्तव्य भावना यावर्षीही उत्स्फुर्तपणे प्रकट होण्याच्या दृष्टीने जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, मुंबई शहर यांचे पत्र क्र. १३०३/ध्व.नि.२०२२/सा.वा./जिसैकका-३ दि. ०३.०२.२०२३ अन्वये केलेल्या विनंतीनुसार सक्षम अधिकारी यांनी वर्ष २०२२-२३ करीता ध्वजदिन निधीचे खालील तक्त्यामध्ये दर्शविण्यात आल्याप्रमाणे वेतनगट निहाय संकलन करण्यास मंजुरी प्रदान केली आहे.

| वेतनगट | प्रत्येकी संकलित करण्यात येणारी रक्कम |
|---|---|
| १ | रु. ४००/- |
| २ | रु. ३००/- |
| ३ | रु. २००/- |
| ४ | रु. १००/- |

३. वरिल तक्त्यामध्ये दर्शविण्यात आलेले संकलन हे सांघिक कार्यालयांतर्गत कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांचे, वर्ष २०२२-२३ साठीची ध्वजदिन निधीची रक्कम माहे **मे २०२३** च्या वेतनातुन संकलित करण्याची सक्षम अधिकारी यांनी मंजुरी दिली आहे. ज्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची मासिक वेतनातुन रक्कम वसुल करण्यास हरकत असेल त्यांनी Employee Portal द्वारा त्यांचा पर्याय वर्ष २०२२-२३ साठी **दि. १९.०५.२०२३** पूर्वी सादर करावेत. ज्या कर्मचा-यांनी हरकत नोंदविली आहे, अशा कर्मचा-यांच्या वेतनातून ध्वजदिन निधीची रक्कम कपात करण्यात येणार नाही.

४. सदर परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

(भूषण कुलकर्णी)
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत सविनय सादर:**
१) संचालक (संचलन)/ (वित्त)/ (वाणिज्य)/ (प्रकल्प)/ (मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) कार्यकारी संचालक (मासं) /(सुवअं)/ (वित्त)/ (देयके व महसूल) म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
३) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/ मुख्य विधी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
४) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई-५१.

**प्रत रवाना :**
१) महाव्यवस्थापक (मासं)/ (मासं-मासंव्यप्र) / (नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/ मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
३) मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई-५१.